## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचा :-**
१) या कार्यालयाचे दक्षता शाखेकडून दिनांक २५/०७/२०१२ रोजी प्राप्त झालेला अहवाल व त्यासोबतची कागदपत्रे.
२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.४७/२०१२/जा.५०२, दिनांक २५/०७/२०१२, ०७/०८/२०१२, २३/०८/२०१२ व ३१/०८/२०१२.
३) सहाय्यक पोलिस निरिक्षक तथा तपासी पोलिस अधिकारी, एपीएमसी पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे दिनांक ३१/०७/२०१२ रोजीचे अभिवेदन.
४) मे. शिवम वेअरहाऊसचे मालक भरत एन. व्होरा यांचे टपालामार्फत प्राप्त दि.०१/०८/२०१२ व ०६/०८/२०१२ रोजीचे निवेदन.
५) मे. अरविंद ट्रेडिंग, मे. चंदरकुमार ओमप्रकाश, मे. हिंगलज इंटरप्रायझेस, मे. तपोवन ट्रेडिंग कंपनी, मे. फाईन फुड प्रॉडक्टस्, मे. वरदान राईस ट्रेडर्स, मे. नरेंद्र ट्रेडिंग कंपनी, मे. अमृतलाल दामजी ॲण्ड कंपनी, मे. सिध्दीविनायक राईस ट्रेडर्स, मे. शिवम कॉर्पोरेशन, मे. नर्मदा ट्रेडर्स, मे. नम्रता कॉर्पोरेशन, मे. द ग्रेन मार्ट, मे. जगदीश आणि कंपनी, मे. नंदादीप ट्रेडिंग कंपनी, मे. श्री शक्ती एंटरप्रायझेस, मे. रघुवीर राईस ट्रेडर्स, मे. जे उदय ॲण्ड कंपनी व मे. किरीटकुमार प्रेमजी धरोड ॲण्ड कंपनी यांचे दिनांक २१/०८/२०१२ रोजीचे स्वतंत्र लेखी निवेदने.
६) सहाय्यक पोलिस निरिक्षक तथा तपासी पोलिस अधिकारी, एपीएमसी पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे दिनांक २१/०८/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदन.
७) या कार्यालयाची पत्र" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.४७/२०१२/जा.५८६, दि. २४/०८/२०१२.
८) मे. संजय कुमार कल्याणजी ॲण्ड कंपनी यांचे दिनांक २९/०८/२०१२ रोजीचे लेखी निवेदन.
९) उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांचा दिनांक २९/०८/२०१२ रोजी प्राप्त अहवाल.
१०) सहाय्यक पोलिस निरिक्षक तथा तपासी पोलिस अधिकारी, एपीएमसी पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे दिनांक ३०/०८/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदन.
११) मे. डिलाईट फुड्स प्रा. लि. व मे. मनीलाल डायाभाई गाला यांचे दिनांक ०४/०९/२०१२ रोजीचे स्वतंत्र लेखी निवेदन.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.४७/२०१२/जा. ६४०
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इशुरस इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई - ४०० ०२०.
दिनांक : १० /०९/२०१२.

## आ दे श

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

**प्रकरणाची पार्श्वभूमी :-**

दिनांक २१/०७/२०१२ रोजी या कार्यालयास, मे. शिवम वेअर हाऊस, प्लॉट नं. ४६, सेक्टर १९ अे, वाशी, नवी मुंबई या ठिकाणी विनापरवाना अन्नधान्य, कडधान्याची साठवणूक केल्याची मिळालेल्या खात्रीलायक बातमीनुसार उपनियंत्रक शिधावाटप फ परिमंडळ, ठाणे व या कार्यालयातील फिरत्या पथकातील अधिकारी/कर्मचारी शामराव विठ्ठल को. ऑप. बँकेजवळ, सेक्टर १९ ए वाशी, नवी मुंबई येथे उपस्थित होऊन दोन पंचास बोलावून घेतले. तेथून वरील पथक पंचांसह जवळच असलेल्या मे. शिवम वेअर हाऊस, प्लॉट नं. ४६, सेक्टर १९ अे, वाशी, नवी मुंबई येथे येऊन पोहचले. गोदामांस समोरील बाजूस दोन लोखंडी रोलिंग शटर्स असल्याचे अधिकाऱ्यांस आढळून आले. गोदामाच्या बाहेर नावाचा फलक लावलेला नसल्याचे आढळले. वरील पथक व पंच यांनी गोदामात प्रवेश केला असता, गोदामात उपस्थित असलेल्या व्यक्तीस त्याचे नांव विचारले असता, त्याने त्याचे नांव उपेश ईश्वरभाई पटेल असे सांगून तो गोदामकिपर म्हणून मे. शिवम वेअरहाऊस येथे गेल्या ४ वर्षापासून काम करीत असल्याचे तसेच मे. शिवम वेअरहाऊसचे मालक भरतकुमार नानजी वोरा हे त्यापोटी त्यांना रुपये १२,०००/- मासिक पगार देत असल्याचे अधिकाऱ्यांना पंचांसमक्ष सांगितले. अधिकाऱ्यांनी मे. शिवम वेअरहाऊसच्या मालकाबाबत चौकशी केली असता, उपस्थिताने वेअरहाऊसचे मालक भरतकुमार नानजी वोरा हे असल्याचे सांगितले. सदर गोदामामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये गोण्या एकावर एक रचून ठेवल्याचे अधिकाऱ्यांना आढळले. याबाबत अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष उपस्थित इसम उपेश ईश्वरभाई पटेल यांस सदर गोदामात काय साठवणूक केलेले आहे. याबाबत विचारणा केली असता, उपस्थिताने सदर गोदामामध्ये तांदूळ व कडधान्याची साठवणूक केलेली असल्याचे अधिकाऱ्यांना पंचासमक्ष सांगितले. साठवणूक केलेल्या तांदूळ व कडधान्याची खरेदी, विक्री साठवणूकीबाबतचा परवाना तसेच इतर तत्सम परवान्यांची मागणी केली असता, उपस्थित इसम उपेश ईश्वरभाई पटेल यांनी सदरचा साठा हा एपीएमसी मार्केट, वाशी येथील व्यापाऱ्यांचा असून वेअर हाऊसमध्ये साठवणूकीकरिता ठेवण्यात आलेला असल्याचे सांगून साठवणूकीबाबत शुल्क म्हणून रुपये ४/- प्रति बाचके प्रति महिना या प्रमाणे आकारत असल्याचे सांगितले. सदर गोदामामध्ये अन्नधान्य/कडधान्य साठवणूकीचा परवाना घेतलेला नसून गोदामाचा गुमास्ता परवाना व अन्न भेसळ प्रतिबंधक परवाना घेण्यात आलेला असून छांयाकित प्रत अधिकाऱ्यांना पंचासमक्ष सादर केली.

त्यानंतर अधिकाऱ्यांनी पंच व उपस्थित इसम उपेश ईश्वरभाई पटेल यांचे समक्ष त्यांनी सांगितलेनुसार साठ्याची मोजदाद केली असता, सदरचा साठा खालीलप्रमाणे आढळला.

| अ.क्र. | व्यापाऱ्यांचे नांव | वस्तूंचे नांव | केलेला साठा (कि.ग्रॅ.) |
|---|---|---|---|
| १ | हिंगलाल इंटरप्रायझेस | तांदूळ | २९९८८० |
| २ | वरदान राईस ट्रेडर्स | तांदूळ | ३२५ |
| ३ | सिध्दीविनायक कॉर्पोरेशन | तांदूळ | ६२१२५ |
| ४ | किरीटकुमार गरोडिया ॲण्ड कंपनी | तांदूळ | ३८९०० |
| ५ | फाईन फुड प्रॉडक्टस् | तांदूळ | २७८२५ |
| ६ | चंदरकुमार ओमप्रकाश | तांदूळ | २९२९० |
| ७ | जे उदय ॲण्ड कंपनी | तांदूळ | ६३४७५ |
| ८ | अरविंद ट्रेडिंग कंपनी | तांदूळ | १३७५० |
| ९ | बॉम्बे सप्लाय | तांदूळ | ४७५ |
| १० | ग्रेन मार्ट | तांदूळ | ५८०० |
| ११ | नर्मदा ट्रेडिंग | तांदूळ | ३५०५० |
| १२ | रघुवीर राईस ट्रेडर्स | तांदूळ | १९०२५ |
| १३ | नंदादीप ट्रेडर्स | तांदूळ | ५०३२५ |
| १४ | नम्रता कॉर्पोरेशन | तांदूळ | २२०७० |
| १५ | संजयकुमार कल्याणजी | तांदूळ | २६५३५ |
| १६ | मनीलाल डायाभाई गाला | तांदूळ | ३२५ |
| १७ | नरेंद्र ट्रेडिंग | तांदूळ | ८२५० |
| १८ | तपोवन राईस | बाजरी | १०५५० |
| १९ | शक्ती एंटरप्रायझेस | तांदूळ | १२३२५० |
| २० | दिलाईट फुड | तांदूळ | ७३६० |
| २१ | जगदीश आणि कंपनी | तांदूळ | ६०३० |
| २२ | अमृतलाल दामजी ॲण्ड कंपनी | तांदूळ | २४५० |
| २३ | मे. शिवम कॉर्पोरेशन | तांदूळ | ८२०७० |
| २४ | जयराज फुड प्रा.लि. | तांदूळ | १४४३० |
| | | तुरडाळ | १५८७० |
| | | मुगडाळ | ९२४० |
| | | उडीद डाळ | ३०६० |
| | | चणा डाळ | १८९० |
| | | चणा | ६२५ |
| | | मूगडाळ (छिलटेवाली) | ७२० |

वरील नमूद साठवणूक केलेला विविध प्रकारचा तांदळाचा एकूण ९३९०१५ कि.ग्रॅ. (९३९०.१५ क्विंटल), विविध प्रकारचे कडधान्य एकूण ३१४०५ कि.ग्रॅ. (३१४.०५ क्विंटल) व बाजरीचा एकूण १०५५० कि.ग्रॅ. (१०५.५० क्विंटल) साठा आढळला. उपस्थित इसम उपेश ईश्वरभाई पटेल यांनी सांगितल्यानुसार उपरोक्त व्यापाऱ्यांनी

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES ... OFFICE

गोदामात साठवणूक केलेल्या तांदूळ व कडधान्यांच्या बिलांबाबत तसेच परवान्यांच्या छायांकित प्रती अथवा वेअर हाऊसमध्ये साठवणूक केल्याबाबत संबंधित प्राधिकरणाकडून प्राप्त परवानगीच्या प्रतींबाबत विचारणा केली असता, याबाबत कोणतेही कागदपत्रे त्यांचेकडे उपलब्ध नसल्याचे त्यांनी अधिकाऱ्यांना पंचासमक्ष सांगितले. तसेच वेअर हाऊसिंगचा परवानाही काढला नसल्याचे सांगितले. त्यामुळे सदरचा साठा हा संबंधित व्यापाऱ्यांचा आहे हे सिध्द झालेले नाही.

अशाप्रकारे उपस्थित गोदामकिपर उपेश ईश्वरभाई पटेल यांनी व गोदामाचे मालक भरतकुमार नानजी वोरा यांनी विनापरवाना, विना वेअरहाऊसिंग परवाना, विना खरेदी बिलाचा साठा अनुक्रमे तांदूळ ९३९०.१५ क्विंटल, एकत्रित कडधान्य एकूण ३१४.०५ क्विंटल याप्रमाणे एकूण रुपये ३,०२,६५,७५०/- किंमतीचा मुद्देमाल साठवणूक केल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८, ९ व १० व दि महाराष्ट्र होलसेल डिलर्स लायसंसिंग ऑर्डर १९९८ च्या तरतुदींचा भंग केल्यावरुन संबंधितांविरुध्द ए.पी.एम.सी. पोलिस ठाणे, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ३०५८/२०१२ दिनांक २२/०७/२०१२ अन्वये गुन्हा नोंद करुन वरील मुद्देमाल जप्त करण्यात आला.

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप (अंमल), मुंबई यांनी वाचावे क्र. १ अन्वये केलेली असून जीवनावश्यक वस्तुंमधील अन्नधान्य व डाळी/कडधान्य या अनुसूचीत वस्तूंचा साठेबाजीच्या उद्देशाने साठवणूक केलेला विनापरवाना साठा शासनजमा का करण्यात येवू नये ? याबाबत वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सर्व संबंधितांना कारणे दाखवा नोटीस बजावून त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आली असून त्याकरीता या कार्यालयात दिनांक ३१/०७/२०१२ रोजी सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक ३१/०७/२०१२ रोजीच्या सुनावणीस एपीएमसी पोलिस ठाणे येथील तपासी पोलिस अधिकारी तथा सहाय्यक पोलिस निरिक्षक श्री. ए.एन. कांटकर हे उपस्थित राहिले व त्यांनी वाचावे क्र. ३ अन्वये लेखी अभिवेदन सादर करुन पुढील तपास सूरु असल्याने सूनावणीची पुढील तारीख मिळण्यास विनंती केली. तसेच सदर सुनावणीस मे. शिवम वेअरहाऊसचे मालक भरतकुमार नानजी व्होरा यांनी उपस्थित राहून लेखी निवेदन पुढील दिवसात सादर करणार असल्याचे तसेच सदरचा साठा हा इतर व्यावसायीक यांचा असल्याचे सांगून त्या अनुषंगाने विविध आस्थापनांची साठा खरेदी बिले व साठा मालक सोबतचे पुर्वलक्षी प्रभावाने माहे जुलै २०१२ च्या पुर्वीच्या तारखेपासून अंमलात असलेले करारपत्रांची छायांकित प्रती सादर केले, याबाबत त्यांना अधिक विचारणा केली

CONTROLLER OF ... HEAD

असता ते अनभिज्ञ असल्याचे सांगून साठा मालक याबाबतची माहिती व साठा संबंधीचे पुरावादर्शक कागदपत्रे सादर करु शकतील असे सांगितले. सबब, मे. शिवम वेअरहाऊसचे मालक तसेच नमूद गोदामातील जप्त साठ्यांचे मालकांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक २१/०८/२०१२ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक २१/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस मे. शिवम वेअरहाऊसचे मालक भरत नानजी व्होरा व त्यांचे वतीने वकालतनामासह ॲड. श्री. सतीश तिवारी यांनी उपस्थित राहून यापूर्वी टपालामार्फत सादर केलेले वाचावे क्र. ४ अन्वये निवेदन कायम असल्याचे सांगून घटनास्थळी करण्यात आलेला पंचनामा व त्यासंबंधीचे इतर दस्तऐवजाच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देण्याची विनंती केली असता, त्याकरिता त्यांना अर्ज सादर करण्याच्या सुचना दिल्या. तसेच सदर सुनावणीस साठामालक म्हणुन मे. अरविंद ट्रेडिंगचे भागीदार अरविंद के शाह, मे. चंदरकुमार ओमप्रकाशचे मालक चंदरकुमार ओमप्रकाश मुरगई, मे. हिंगलज एंटरप्रायझेसचे मालक रमेशचंद्र शिवजी भद्रा, मे. तपोवन ट्रेडिंग कंपनीचे मालक माधवजी भानुशाली, मे. फाईन फुड प्रॉडक्टस्चे मालक हिमांशु वसंत केसरीया, मे. वरदान राईस ट्रेडर्सचे मालक वालजी ठाकरशी गजरा, मे. नरेंद्र ट्रेडिंग कंपनीचे मालक शंकरलाल कानजी भानुशाली, मे. अमृतलाल दामजी ॲण्ड कंपनीचे मालक अमृतलाल दामजी नागडा, मे. सिध्दीविनायक राईस ट्रेडर्सचे मालक बिपीन मुरजीभाई भानुशाली, मे. शिवम कॉर्पोरेशनचे भागीदार लिनेश खिमजी विरा, मे. नर्मदा ट्रेडर्सचे भागीदार जिग्नेश गोविंदजी केसरीया, मे. नम्रता कॉर्पोरेशनचे मालक शामजी लक्ष्मीदास भानुशाली, मे. द ग्रेन मार्टचे मालक आदित्य गर्ग, मे. जगदीश ॲन्ड कंपनीचे मालक जगदिश धिरजलाल रांभिया, मे. नंदादीप ट्रेडिंग कंपनीचे भागीदार परेश रतीलाल त्रिपाठी, मे. श्री शक्ती एंटरप्रायझेसचे भागीदार चंदुलाल शामजी भानुशाली, मे. रघुवीर राईस ट्रेडर्सचे मालक प्रताप प्रेमजी कटारमल, मे. जे उदय ॲण्ड कंपनीचे भागीदार उदय शंभुलाल मंगे, मे. किरीटकुमार गरोडीया ॲण्ड कंपनीचे अकाऊंडट महेंद्रकुमार कांतीलाल पटेल व त्यांनी त्यांचे वाचावे क्र. ५ अन्वये स्वतंत्र लेखी निवेदने सादर केली. मे. जयराज फुड प्रा.लि. चे मालक मयुर सोनी व मे. बॉम्बे सप्लायचे मॅनेजर किशोर जेठालाल शहा हे उपस्थित राहिले व त्यांनी त्यांच्या जप्त साठयाबाबतचे पुरावादर्शक कागदपत्रे मे. शिवम वेअरहाऊस चे मालक यांच्यामार्फत यापूर्वी सादर केलेल्या लेखी निवेदनासोबत सादर केले असल्याचे सांगितले. तसेच सदर सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तसेच इतर इतर साठामालक उपस्थित नव्हते. सबब, सर्व संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक २९/०८/२०१२ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक २१/०८/२०१२ रोजी मे. शिवम वेअर हाऊसचे मालक भरत नानजी व्होरा यांनी या कार्यालयात ठेवण्यात आलेल्या सुनावणीचे वेळी सदर गुन्हयात जप्त करण्यात आलेला परंतु अनुसुचित वस्तूंच्या यादीत समाविष्ठ नसलेला साठा हा साठा मालकास परत करण्याची तसेच जप्त साठयाचे धुरीकरण (Fumigation) करण्याच्या परवानगी मिळणेकरीता विनंती केल्याने नमूद वेअरहाऊसमधील अनुसुचित वस्तूव्यतिरिक्त जप्त असलेला ब्राजरीचा १०५.५० क्विंटल साठा हा खराब होऊ नये म्हणून त्यांच्या साठा मालकास तात्काळ परत करण्याचे व जप्त साठयांचे धुरीकरण (Fumigation) करुन उर्वरीत अन्नधान्य व कडधान्यांचा जप्त करण्यात आलेला साठा हा पुढील आदेशापर्यंत जैसे थे स्थितीत जतन करण्याबाबत या कार्यालयाचे वाचावे क्र. ७ अन्वये पत्र निर्गमित करण्यात आले.

दिनांक २९/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस रोजीच्या सुनावणीस मे. संजयकुमार कल्याणजीचे मालक संजय कल्याणजी लोढाया यांनी उपस्थित राहून वाचावे क्र. ८ अन्वये लेखी निवेदन सादर केले. सदर सुनावणीसही इतर साठा मालक उपस्थित राहिले नाहीत. सबब, संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी अंतीम सुनावणी दिनांक ०४/०९/२०१२ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक ०४/०९/२०१२ रोजीच्या सुनावणीस मे. मुनीलाल डायाभाई गालाचे मालक मनीलाल डायाभाई गाला तसेच मे. डिलाईट फुड्स प्रा. लि. चे संचालक संतोष सुमतीलाल मुथा यांनी वाचावे क्र. ११ अन्वये त्यांचे स्वतंत्र लेखी निवेदने सादर केले.

सबब, प्रकरण गुणवत्तेवर निर्णयास्तव राखून ठेवण्यात आले.

<u>युक्तिवाद</u> :-

दिनांक ३१/०७/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित एपीएमसी पोलिस ठाणे येथील तपासी पोलिस अधिकारी तथा सहाय्यक पोलिस निरिक्षक श्री. ए.एन. काटकर यांनी युक्तीवाद केला की, एकंदरीत झालेल्या तपासावरुन यातील अटक आरोपी यांनी आपसात संगणमत करुन त्यांचे मे. शिवम वेअरहाऊसमध्ये ३,०२,६५,७५०/- रुपये किंमतीचा अन्नधान्य व कडधान्याचा साठा शिधावाटप आस्थापनेचा घाउक संयुक्त परवाना (पीडीएल/एफडीएल) नसताना बेकायदेशिररित्या साठवणूक केला असल्याचे निष्पन्न झाले आहे. सदर गुन्ह्यात जप्त करण्यात आलेला अन्नधान्य/कडधान्याचा साठा हा विविध व्यापाऱ्यांचा असून त्यांचा सदरचा साठा यातील अटक आरोपी यांनी शिधावाटप आस्थापनेचा घाउक संयुक्त परवाना (पीडीएल/एफडीएल) नसताना बेकायदेशिररित्या

साठवणूक केला असल्याचे निष्पन्न झाले असल्याने नमूद धान्याच्या साठ्याबाबत योग्य तो आदेश होणेस विनंती आहे, असे सांगून तसे लेखी अभिवेदन सादर केले.

मे. शिवम वेअरहाऊसचे मालक भरत एन. व्होरा यांचे टपालामार्फत प्राप्त दिनांक ०१/०८/२०१२ रोजीच्या निवेदनांत, त्यांचे वेअरहाऊस हे मे. कामधेनु एन्टरप्रायझेस यांच्याकडून दिनांक ३०/०९/२०१३ पर्यंत ३३ महिन्यांच्या कालावधीकरीता भाडेतत्वावर वेअरहाऊसिंग करीता घेतल्याचे नमुद करुन सदर वेअरहाऊसिंगच्या व्यवसायाकरीता एनएनएमसी तसेच अन्न व औषध प्रशासन विभागाकडून परवाना घेतले असल्याचे नमुद केले आहे. दिनांक २१/०७/२०१२ रोजी घटनास्थळी उपस्थित पथकास त्यांचे लेखनिक श्री शैल जयसिंग गोरी हे वैयक्तीक कारणांमुळे लवकर निघुन गेल्याने त्यांना वैध पुरावादर्शक कागदपत्रे सादर करणे शक्य झाले नसल्याबाबत दिलगीरी व्यक्त केली आहे. वेअरहाऊसमधील ठेवण्यात आलेल्या साठयाबाबतची कागदपत्रे त्यांच्या कार्यालयीन परिसरात कुलुपबंद असल्याने ते सादर करु शकले नसल्याचे नमुद करुन त्यांच्या वेअरहाऊसमधील जप्त करण्यात आलेला साठा हा विविध साठामालकांचा असल्याचे नमुद केले आहे. त्याबाबतचे आवश्यक कागदपत्रे निवेदनासोबत सादर केले असल्याचे नमुद केले. कारणे दाखवा नोटीसमधील नमुद जप्त साठा यामध्ये तफावत असल्याचे सांगुन त्यांच्या वेअरहाऊसमधील दैनिक साठा नोंदवही दिनांक २१/०७/२०१२ पर्यंत अद्यावत असल्याचे नमुद करुन त्याअनुषंगाने आढळून आलेली तफावत साठामालक निहाय यादी जोडण्यात आली आहे. मे. तपोवन ट्रेडिंग कंपनी यांनी ५० किलो क्षमतेच्या २११ बाचक्यांमधील बाजरीचा साठा साठवणुक केला असल्याचे सांगुन सदर जिन्नस करीता शिधावाटप परवाण्याची गरज नसल्याचे नमुद केले आहे. जप्त करण्यात आलेल्या साठयाचे धुरीकरण (Fumigation) ची परवानगी देण्यात यावी. बाजरीचा साठा मुक्त करण्यात यावा. वेअरहाऊस व त्यामधील जप्त साठा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २१/०८/२०१२ रोजीच्या सुनावंणीस उपस्थित मे. हिंगलज एंटरप्रायझेसचे मालक रमेशचंद्र शिवजी भद्रा यांनी युक्तीवाद केला की, ते मागील १० वर्षापासुन अन्नधान्य व कडधान्याचा व्यवसाय करीत असुन त्याकरीता त्यांचेकडे दिनांक ३१/१२/२०१५ पर्यंत वैध असलेला संयुक्त घाऊक परवाना क्रमांक ५३ आहे. सदर साठा त्यांनी त्यांच्या गोदामात अपुरी जागा असल्याने मे. शिवम वेअरहाऊस येथे साठवणुक केल्याचे नमुद करुन सदर साठयाच्या पुराव्यादाखल खरेदी बिले, संयुक्त घाऊक परवाना, करारनामा तसेच शिवम वेअरहाऊस हे त्यांच्या परवान्यावर कायमस्वरुपी अतिरीक्त गोदाम म्हणुन नोंद करुन घेण्यासाठी दिनांक १६/०७/२०१२ रोजी शिधावाटप कार्यालय, फ परिमंडळ ठाणे येथे सादर केलेले अर्ज या सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रती सादर केल्या असुन आवश्यकतेनुसार त्यांनी कागदपत्रांची पुर्तता केली असल्याने त्यांचा जप्त साठा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २१/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. वरदान राईस ट्रेडर्सचे मालक वालजी ठाकरशी गजरा यांनी युक्तीवाद केला की, ते मागील ८ वर्षापासुन अन्नधान्य व कडधान्याचा व्यवसाय करीत असुन त्याकरीता त्यांचेकडे दिनांक ३१/१२/२०१२ पर्यंत वैध असलेला संयुक्त घाऊक परवाना क्रमांक ८८ आहे. सदर साठा त्यांनी त्यांच्या गोदामात अपुरी जागा असल्याने मे. शिवम वेअरहाऊस येथे साठवणुक केल्याचे नमुद करुन सदर साठयाच्या पुराव्यादाखल खरेदी बिले, संयुक्त घाऊक परवाना, विवरणपत्र, करारनामा इ. कागदपत्रांच्या छायांकित प्रती सादर केल्या असुन आवश्यकतेनुसार त्यांनी कागदपत्रांची पुर्तता केली असल्याने त्यांचा जप्त साठा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २१/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. सिध्दीविनायक राईस ट्रेडर्सचे मालक बिपीन मुरजीभाई भानुशाली यांनी युक्तीवाद केला की, त्यांनी २५ किलो क्षमतेच्या ३१७८ बाचक्यांमधील तांदळाचा साठा हा शिवम वेअरहाऊस येथे सिध्दीविनायक राईस ट्रेडर्स या नावाने साठवणुक केले आहे. तथापी, शिवम वेअरहाऊसच्या प्रतिनिधींनी घटनास्थळी चुकुन सिध्दीविनायक कॉर्पोरेशन चा साठा असल्याचे सांगितले आहे. याबाबत त्यांनी सिध्दीविनायक कॉर्पोरेशन यांचे निवेदन सोबत जोडले आहे. मे. सिध्दीविनायक राईस ट्रेडर्सचे मालक यांनी साठयाच्या पुराव्यादाखल खरेदी बिले, संयुक्त घाऊक परवाना, विवरणपत्र, करारनामा इ. कागदपत्रांच्या छायांकित प्रती सादर केल्या असुन आवश्यकतेनुसार त्यांनी कागदपत्रांची पुर्तता केली असल्याने त्यांचा जप्त साठा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २१/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. किरीटकुमार प्रेमजी धरोड ॲण्ड कंपनीचे अकाऊंटट महेंद्रकुमार कांतीलाल पटेल यांनी कंपनीच्या वतीने सादर केलेल्या निवेदनात, ते मागील १० वर्षापासुन अन्नधान्य व कडधान्याचा व्यवसाय करीत असुन त्याकरीता त्यांचेकडे दिनांक ३१/१२/२०१२ पर्यंत वैध असलेला संयुक्त घाऊक परवाना क्रमांक २८६ आहे. सदर साठा त्यांनी त्यांच्या गोदामात अपुरी जागा असल्याने मे. शिवम वेअरहाऊस यांच्याशी झालेल्या करारनामानुसार त्यांनी तेथे साठवणुक केल्याचे नमुद करुन सदर साठयाच्या पुराव्यादाखल खरेदी बिले, संयुक्त घाऊक परवाना, विवरणपत्र, करारनामा इ. कागदपत्रांच्या छायांकित प्रती सादर केल्या असुन आवश्यकतेनुसार त्यांनी कागदपत्रांची पुर्तता केली असल्याने त्यांचा जप्त साठा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २१/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. फाईन फुड प्रॉडक्टस्चे मालक हिमांशु वसंत केसरीया यांनी युक्तीवाद केला की, ते मागील १३ वर्षापासुन अन्नधान्य व कडधान्याचा व्यवसाय करीत असुन त्याकरीता त्यांचेकडे दिनांक ३१/१२/२०१२ पर्यंत वैध असलेला संयुक्त घाऊक परवाना क्रमांक २७४ आहे. सदर साठा त्यांनी त्यांच्या गोदामात अपुरी जागा असल्याने मे. शिवम वेअरहाऊस येथे साठवणुक केल्याचे नमुद करुन

सदर साठयाच्या पुराव्यादाखल खरेदी बिले, संयुक्त घाऊक परवाना, विवरणपत्र, करारनामा इ. कागदपत्रांच्या छायांकित प्रती सादर केल्या असुन आवश्यकतेनुसार त्यांनी कागदपत्रांची पुर्तता केली असल्याने त्यांचा जप्त साठा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २१/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. चंदरकुमार ओमप्रकाशचे मालक चंदरकुमार ओमप्रकाश मुरगई यांनी युक्तीवाद केला की, त्यांचा शिवम वेअरहाऊस येथील साठवणुक केलेल्या तांदळाच्या साठयाच्या पुराव्यादाखल खरेदी बिले, लॉरी बिल्टी, संयुक्त घाऊक परवाना, विवरणपत्र इ. कागदपत्रांच्या छायांकित प्रती सादर केल्या असुन त्यांचा जप्त साठा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २१/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. जे उदय ॲण्ड कंपनीचे भागीदार उदय शंभुलाल मंगे यांनी युक्तीवाद केला की, ते मागील १५ वर्षापासुन अन्नधान्य व कडधान्याचा व्यवसाय करीत असुन त्याकरीता त्यांचेकडे दिनांक ३१/१२/२०१२ पर्यंत वैध असलेला संयुक्त घाऊक परवाना क्रमांक २६७ आहे. सदर साठा त्यांनी त्यांच्या गोदामात अपुरी जागा असल्याने मे. शिवम वेअरहाऊस येथे साठवणुक केल्याचे नमुद करुन सदर साठयाच्या पुराव्यादाखल खरेदी बिले, संयुक्त घाऊक परवाना, विवरणपत्र, करारनामा व शिवम वेअर हाऊस या अतिरीक्त गोदामाची कायमस्वरुपी नोंद करण्याकरीता केलेला अर्ज इ. कागदपत्रांच्या छायांकित प्रती सादर केल्या असुन आवश्यकतेनुसार त्यांनी कागदपत्रांची पुर्तता केली असल्याने त्यांचा जप्त साठा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २१/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. अरविंद ट्रेडिंगचे भागीदार अरविंद के शाह यांनी युक्तीवाद केला की, ते मागील ३० वर्षापासुन अन्नधान्य व कडधान्याचा व्यवसाय करीत असुन त्याकरीता त्यांचेकडे संयुक्त घाऊक परवाना क्रमांक ४४१ आहे. सदर साठा त्यांनी त्यांच्या गोदामात अपुरी जागा असल्याने मे. शिवम वेअरहाऊस येथे साठवणुक केल्याचे नमुद करुन सदर साठयाच्या पुराव्यादाखल खरेदी बिले, संयुक्त घाऊक परवाना, विवरणपत्र, करारनामा व शिवम वेअर हाऊस या अतिरीक्त गोदामाची कायमस्वरुपी नोंद करण्याकरीता केलेला अर्ज इ. कागदपत्रांच्या छायांकित प्रती सादर केल्या असुन आवश्यकतेनुसार त्यांनी कागदपत्रांची पुर्तता केली असल्याने त्यांचा जप्त साठा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २१/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. द ग्रेन मार्टचे मालक आदित्य गर्ग यांनी युक्तीवाद केला की, ते मागील ८ वर्षापासुन अन्नधान्य व कडधान्याचा व्यवसाय करीत असुन त्याकरीता त्यांचेकडे दिनांक ३१/१२/२०१२ पर्यंत वैध असलेला संयुक्त घाऊक परवाना क्रमांक ४४६ आहे. सदर साठा त्यांनी त्यांच्या गोदामात अपुरी जागा असल्याने मे. शिवम वेअरहाऊस येथे साठवणुक केल्याचे नमुद करुन सदर साठयाच्या पुराव्यादाखल खरेदी बिले, संयुक्त घाऊक परवाना, विवरणपत्र, करारनामा व शिवम वेअर हाऊस या अतिरीक्त गोदामाची

0010 कायमस्वरुपी नोंद करण्याकरीता केलेला अर्ज इ. कागदपत्रांच्या छायांकित प्रती सादर केल्या असुन आवश्यकतेनुसार त्यांनी कागदपत्रांची पुर्तता केली असल्याने त्यांचा जप्त साठा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २१/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. नर्मदा ट्रेडर्सचे भागीदार जिग्नेश गोविंदजी केसरीया यांनी युक्तीवाद केला की, ते मागील १ वर्षापासुन अन्नधान्य व कडधान्याचा व्यवसाय करीत असुन त्याकरीता त्यांचेकडे दिनांक ३१/१२/२०१६ पर्यंत वैध असलेला संयुक्त घाऊक परवाना क्रमांक ८४४ आहे. सदर साठा त्यांनी त्यांच्या गोदामात अपुरी जागा असल्याने मे. शिवम वेअरहाऊस येथे साठवणुक केल्याचे नमुद करुन सदर साठयाच्या पुराव्यादाखल खरेदी बिले, संयुक्त घाऊक परवाना, विवरणपत्र व करारनामा या कागदपत्रांच्या छायांकित प्रती सादर केल्या असुन आवश्यकतेनुसार त्यांनी कागदपत्रांची पुर्तता केली असल्याने त्यांचा जप्त साठा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २१/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. रघुवीर राईस ट्रेडर्सचे मालक प्रताप प्रेमजी कटारमल यांनी युक्तीवाद केला की, ते मागील ५ वर्षापासुन अन्नधान्य व कडधान्याचा व्यवसाय करीत असुन त्याकरीता त्यांचेकडे दिनांक ३१/१२/२०१२ पर्यंत वैध असलेला संयुक्त घाऊक परवाना क्रमांक ५३६ आहे. सदर साठा त्यांनी त्यांच्या गोदामात अपुरी जागा असल्याने मे. शिवम वेअरहाऊस येथे साठवणुक केल्याचे नमुद करुन सदर साठयाच्या पुराव्यादाखल खरेदी बिले, संयुक्त घाऊक परवाना व करारनामा या कागदपत्रांच्या छायांकित प्रती सादर केल्या असुन आवश्यकतेनुसार त्यांनी कागदपत्रांची पुर्तता केली असल्याने त्यांचा जप्त साठा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २१/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. नंदादीप ट्रेडिंग कंपनीचे भागीदार परेश रतीलाल त्रिपाठी यांनी युक्तीवाद केला की, ते मागील १० वर्षापासुन अन्नधान्य व कडधान्याचा व्यवसाय करीत असुन त्याकरीता त्यांचेकडे दिनांक ३१/१२/२०१२ पर्यंत वैध असलेला संयुक्त घाऊक परवाना क्रमांक १९८ आहे. सदर साठा त्यांनी त्यांच्या गोदामात अपुरी जागा असल्याने मे. शिवम वेअरहाऊस येथे साठवणुक केल्याचे नमुद करुन सदर साठयाच्या पुराव्यादाखल खरेदी बिले, संयुक्त घाऊक परवाना, विवरणपत्र, करारनामा व शिवम वेअर हाऊस या अतिरीक्त गोदामाची कायमस्वरुपी नोंद करण्याकरीता केलेला अर्ज इ. कागदपत्रांच्या छायांकित प्रती सादर केल्या असुन आवश्यकतेनुसार त्यांनी कागदपत्रांची पुर्तता केली असल्याने त्यांचा जप्त साठा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २१/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. नम्रता कॉर्पोरेशनचे मालक शामजी लक्ष्मदास भानुशाली यांनी युक्तीवाद केला की, ते मागील १० वर्षापासुन अन्नधान्य व कडधान्याचा व्यवसाय करीत असुन

त्याकरीता त्यांचेकडे दिनांक ३१/१२/२०१४ पर्यंत वैध असलेला संयुक्त घाऊक परवाना क्रमांक ७४४ आहे. सदर साठा त्यांनी त्यांच्या गोदामात अपुरी जागा असल्याने मे. शिवम वेअरहाऊस येथे साठवणुक केल्याचे नमुद करुन सदर साठयाच्या पुराव्यादाखल खरेदी बिले, संयुक्त घाऊक परवाना व करारनामा या कागदपत्रांच्या छायांकित प्रती सादर केल्या असुन आवश्यकतेनुसार त्यांनी कागदपत्रांची पुर्तता केली असल्याने त्यांचा जप्त साठा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २१/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. नरेंद्र ट्रेडिंग कंपनीचे मालक शंकरलाल कानजी भानुशाली यांनी युक्तीवाद केला की, ते मागील १० वर्षापासुन अन्नधान्य व कडधान्याचा व्यवसाय करीत असुन त्याकरीता त्यांचेकडे दिनांक ३१/१२/२०१२ पर्यंत वैध असलेला संयुक्त घाऊक परवाना क्रमांक २१४ आहे. सदर साठा त्यांनी त्यांच्या गोदामात अपुरी जागा असल्याने मे. शिवम वेअरहाऊस येथे साठवणुक केल्याचे नमुद करुन सदर साठयाच्या पुराव्यादाखल खरेदी बिले, संयुक्त घाऊक परवाना, करारनामा व विवरणपत्र या कागदपत्रांच्या छायांकित प्रती सादर केल्या असुन आवश्यकतेनुसार त्यांनी कागदपत्रांची पुर्तता केली असल्याने त्यांचा जप्त साठा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २१/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. तपोवन ट्रेडिंग कंपनीचे मालक माधवजी भानुशाली यांनी युक्तीवाद केला की, ते मागील ८ वर्षापासुन अन्नधान्य व कडधान्याचा व्यवसाय करीत असुन त्याकरीता त्यांचेकडे दिनांक ३१/१२/२०१५ पर्यंत वैध असलेला संयुक्त घाऊक परवाना क्रमांक ६१ आहे. सदर साठा त्यांनी त्यांच्या गोदामात अपुरी जागा असल्याने मे. शिवम वेअरहाऊस येथे साठवणुक केल्याचे नमुद करुन सदर साठयाच्या पुराव्यादाखल खरेदी बिले, संयुक्त घाऊक परवाना व करारनामा या कागदपत्रांच्या छायांकित प्रती सादर करुन मे. शिवम वेअरहाऊसमध्ये त्यांचा २११ बाचक्यांमधील बाजरीचा साठा हा अनुसुचित वस्तूंमध्ये येत नसल्याने सदरचा साठा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २१/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. श्री शक्ती एंटरप्रायझेसचे भागीदार चंदुलाल शामजी भानुशाली यांनी युक्तीवाद केला की, ते मागील १४ वर्षापासुन अन्नधान्य व कडधान्याचा व्यवसाय करीत असुन त्याकरीता त्यांचेकडे दिनांक ३१/१२/२०१२ पर्यंत वैध असलेला संयुक्त घाऊक परवाना क्रमांक ५२५ आहे. सदर साठा त्यांनी त्यांच्या गोदामात अपुरी जागा असल्याने मे. शिवम वेअरहाऊस येथे साठवणुक केल्याचे नमुद करुन सदर साठयाच्या पुराव्यादाखल खरेदी बिले, संयुक्त घाऊक परवाना, करारनामा व विवरणपत्र या कागदपत्रांच्या छायांकित प्रती सादर केल्या असुन आवश्यकतेनुसार त्यांनी कागदपत्रांची पुर्तता केली असल्याने त्यांचा जप्त साठा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

DIRECTOR ... CIVIL SUPPLIES OFFICE ... MUMBAI

0012 दिनांक २१/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. जगदीश आणि कंपनीचे मालक जगदिश धिरजलाल शंभिया यांनी युक्तीवाद केला की, ते मागील ४३ वर्षापासुन अन्नधान्य व कडधान्याचा व्यवसाय करीत असुन त्याकरीता त्यांचेकडे दिनांक ३१/१२/२०१२ पर्यंत वैध असलेला संयुक्त घाऊक परवाना क्रमांक ३६६ आहे. सदर साठा त्यांनी त्यांच्या गोदामात अपुरी जागा असल्याने मे. शिवम वेअरहाऊस येथे साठवणुक केल्याचे नमुद केले आहे. तसेच त्यांच्या घाऊक परवान्यावर मे. शिवम वेअरहाऊस या अतिरिक्त गोदामाची नोंद करण्यात आलेली आहे. सदर साठयाच्या पुराव्यादाखल खरेदी बिले, संयुक्त घाऊक परवाना, करारनामा व विवरणपत्र या कागदपत्रांच्या छायांकित प्रती सादर केल्या असुन आवश्यकतेनुसार त्यांनी कागदपत्रांची पुर्तता केली असल्याने त्यांचा जप्त साठा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २१/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. अमृतलाल दामजी ॲण्ड कंपनीचे मालक अमृतलाल दामजी नाकडा यांनी युक्तीवाद केला की, ते मागील ७ वर्षापासुन अन्नधान्य व कडधान्याचा व्यवसाय करीत असुन त्याकरीता त्यांचेकडे दिनांक ३१/१२/२०१५ पर्यंत वैध असलेला संयुक्त घाऊक परवाना क्रमांक २० आहे. सदर साठा त्यांनी त्यांच्या गोदामात अपुरी जागा असल्याने मे. शिवम वेअरहाऊस येथे साठवणुक केल्याचे नमुद करुन सदर साठयाच्या पुराव्यादाखल खरेदी बिले, संयुक्त घाऊक परवाना, करारनामा व शिवम वेअर हाऊस या अतिरीक्त गोदामाची कायमस्वरुपी नोंद करण्याकरीता केलेला अर्ज इ. कागदपत्रांच्या छायांकित प्रती सादर केल्या असुन आवश्यकतेनुसार त्यांनी कागदपत्रांची पुर्तता केली असल्याने त्यांचा जप्त साठा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २१/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. शिवम कॉर्पोरेशनचे भागीदार लिनेश खिमजी विरा यांनी युक्तीवाद केला की, ते मागील १० वर्षापासुन अन्नधान्य व कडधान्याचा व्यवसाय करीत असुन त्याकरीता त्यांचेकडे दिनांक ३१/१२/२०१२ पर्यंत वैध असलेला संयुक्त घाऊक परवाना क्रमांक २३३ आहे. सदर साठा त्यांनी त्यांच्या गोदामात अपुरी जागा असल्याने मे. शिवम वेअरहाऊस येथे साठवणुक केल्याचे नमुद करुन सदर साठयाच्या पुराव्यादाखल खरेदी बिले, संयुक्त घाऊक परवाना व करारनामा व शिवम वेअर हाऊस या अतिरीक्त गोदामाची कायमस्वरुपी नोंद करण्याकरीता केलेला अर्ज इ. कागदपत्रांच्या छायांकित प्रती सादर केल्या असुन आवश्यकतेनुसार त्यांनी कागदपत्रांची पुर्तता केली असल्याने त्यांचा जप्त साठा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

मे. जयराज फुड प्रा.लि. चे मालक मयुर सोनी व मे. बॉम्बे सप्लायचे मॅनेजर किंशोर जेठालाल शहा हे उपस्थित राहिले व त्यांनी त्यांच्या जप्त साठयाबाबतचे पुरावादर्शक कागदपत्रे मे. शिवम वेअरहाऊस चे मालक यांच्यामार्फत यापूर्वी सादर केलेल्या लेखी निवेदनासोबत सादर केले असल्याचे सांगितले.

RATIONING ... HEAD OF ... MUMBAI

एपीएमसी पोलिस ठाणे येथील सहाय्यक पोलिस निरिक्षक श्री. ए.एन. काटकर यांनी दिनांक २१/०८/२०१२ रोजी टपालामार्फत सादर केलेल्या अभिवेदनात, श्री. जगदीश धीरजलाल रांभीया, जगदीश ॲण्ड कंपनी यांचेकडील शिधावाटप आस्थापनेचा घाऊक संयुक्त परवानावर (पीडीएल/एफडीएल) शिवम वेअरहाऊसची नोंद आहे. श्री. वालजी ठाकरशी गजरा - वरदान राईस ट्रेडर्स, श्री बिपीन मुरजी भानुशाली - सिध्दीविनायक राईस ट्रेडर्स, श्री. उदय शंभुलाल मंगे - मे. जे उदय ॲण्ड कंपनी, श्री. किशोर जेठालाल शहा - बॉम्बे सप्लायर्स, श्री. संजय कल्याणजी लोढाया - संजयकुमार कल्याणजी ॲण्ड कंपनी, श्री. शंकरलाल कानजी भानुशाली - नरेंद्र ट्रेडिंग या व्यापाऱ्यांचे करारनामे गुन्हा दाखल झाल्यानंतर करण्यात आलेले आहेत. सदर गुन्ह्यात जप्त करण्यात आलेला अन्नधान्य/कडधान्याचा साठा हा विविध व्यापाऱ्यांचा असून त्यांचा सदरचा साठा यातील अटक आरोपी यांनी शिधावाटप आस्थापनेचा घाउक संयुक्त परवाना (पीडीएल/एफडीएल) नसताना बेकायदेशिररित्या साठवणूक केला असल्याचे निष्पन्न झाले असल्याने नमूद धान्याच्या साठ्याबाबत योग्य तो आदेश होणेस विनंती आहे, असे नमूद केले आहे.

दिनांक २९/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. संजयकुमार कल्याणजीचे मालक संजय कल्याणजी लोढाया यांनी युक्तीवाद केला की, ते मागील ३ वर्षापासुन अन्नधान्य व कडधान्याचा व्यवसाय करीत असुन त्याकरीता त्यांचेकडे दिनांक ३१/१२/२०१४ पर्यंत वैध असलेला संयुक्त घाऊक परवाना क्रमांक ७३४ आहे. सदर साठा त्यांनी त्यांच्या गोदामात अपुरी जागा असल्याने मे. शिवम वेअरहाऊस येथे साठवणुक केल्याचे नमुद करुन सदर साठयाच्या पुराव्यादाखल खरेदी बिले, संयुक्त घाऊक परवाना, करारनामा व विवरणपत्र या कागदपत्रांच्या छायांकित प्रती सादर केल्या असुन आवश्यकतेनुसार त्यांनी कागदपत्रांची पुर्तता केली असल्याने त्यांचा जप्त साठा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक ०४/०९/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. मुनीलाल डायाभाई गालाचे मालक मनीलाल डायाभाई गाला यांनी युक्तीवाद केला की, ते मागील १० वर्षापासुन अन्नधान्य व कडधान्याचा व्यवसाय करीत असुन त्याकरीता त्यांचेकडे दिनांक ३१/१२/२०१२ पर्यंत वैध असलेला संयुक्त घाऊक परवाना क्रमांक ५०८ आहे. सदर साठा त्यांनी त्यांच्या गोदामात अपुरी जागा असल्याने मे. शिवम वेअरहाऊस येथे साठवणुक केल्याचे नमुद करुन सदर साठयाच्या पुराव्यादाखल खरेदी बिले, संयुक्त घाऊक परवाना व करारनामा या कागदपत्रांच्या छायांकित प्रती सादर केल्या असुन आवश्यकतेनुसार त्यांनी कागदपत्रांची पुर्तता केली असल्याने त्यांचा जप्त साठा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक ०४/०९/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. डिलाईट फुड्स प्रा. लि. चे संचालक संतोष सुमतीलाल मुथा यांनी युक्तीवाद केला की, ते मागील ६ वर्षापासुन अन्नधान्य व कडधान्याचा व्यवसाय करीत असुन

त्याकरीता त्यांचेकडे दिनांक ३१/१२/२०१२ पर्यंत वैध असलेला संयुक्त घाऊक परवाना क्रमांक २८३ आहे. सदर साठा त्यांनी त्यांच्या गोदामात अपुरी जागा असल्याने मे. शिवम वेअरहाऊस येथे साठवणुक केल्याचे नमुद करुन सदर साठयाच्या पुराव्यादाखल खरेदी बिले, संयुक्त घाऊक परवाना, करारनामा व शिवम वेअर हाऊस या अतिरीक्त गोदामाची कायमस्वरुपी नोंद करण्यांकरीता केलेला अर्ज इ. कागदपत्रांच्या छायांकित प्रती सादर केल्या असुन आवश्यकतेनुसार त्यांनी कागदपत्रांची पुर्तता केली असल्याने त्यांचा जप्त साठा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांनी सादर केलेल्या अहवालात, जप्त साठ्याचे साठामालकांकडे महाराष्ट्र शेडयुल्ड कमोडीटीज होलसेल डिलर्स लायसंसिंग ऑर्डर, १९९८ अन्वये अन्नधान्य/कडधान्याच्या घाऊक व्यापाराकरिता आवश्यक असलेल्या परवाना साठा मालकांनी धारण केला आहे किंवा कसे ? असल्यास त्याचे तपशिल, परवानाधारकाचा पत्ता, परवानावरील वेगळे गोदाम नमूद आहे किंवा कसे ? असल्यास त्याचा तपशिल व नसल्यास जप्त करण्यात आलेल्या गोदामात साठा मालकांनी साठवणूक केल्याबाबतचे सुचनापत्र दिले आहे किंवा कसे ? तसेच परवाना असल्यास त्याची वैधता याबाबतचा साठामालक निहाय परिपूर्ण अहवाल सादर केला आहे.

---

<u>निष्कर्ष</u> :-

प्रस्तुत प्रकरणातील अपचारी यांचा युक्तिवाद, निवेदन, पोलिसांचे अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तूत प्रकरणी, दिनांक २१/०७/२०१२ रोजी या कार्यालयातील फिरत्या पथकातील अधिकारी/कर्मचारी पंचांसह मे. शिवम वेअर हाऊस, प्लॉट क्र. ४६, सेक्टर १९ ओ, वाशी, नवी मुंबई या ठिकाणी टाकण्यात आलेल्या धाडीत विविध अन्नधान्य व कडधान्यांचा साठा हा साठवणूकीच्या आवश्यक कागदपत्र व परवान्याशिवाय आढळून आल्याने अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष जप्त करुन संबंधितांविरुध्द जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८, ९ व १० व महाराष्ट्र अनुसुचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश १९९८ च्या तरतुदींचा भंग केल्यावरुन ए.पी.एम.सी. पोलिस ठाणे, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ३०५८/२०१२ दिनांक २२/०७/२०१२ अन्वये गुन्हा नोंद करुन वरील मुद्देमाल जप्त करण्यात आला.

CONTROLLER OF RATIONI... HE...

केंद्र शासनाची अधिसुचना क्र. एस.ओ.२२२७ (अ), दिनांक २७ सप्टेंबर, २०११ अन्वये डाळी/कडधान्य, खाद्यतेल व खाद्यतेलबिया या अनुसुचित वस्तूंवर दिनांक ३०/०९/२०१२ पर्यंत निर्बंध आहेत. तसेच केंद्र शासनाची अधिसुचना क्र. एस.ओ.२७१६ (अ), दिनांक २९ नोव्हेंबर, २०११ अन्वये तांदुळ या अनुसुचित वस्तूवर दिनांक ३०/११/२०१२ पर्यंत निर्बंध आहेत.

शासन परिपत्रक क्र. ईसीए-१००८/६२२/प्र.क्र.२८४/ना.पु.२३ दिनांक ९ मे, २००८ अन्वये शासनाने लागु केलेल्या साठामर्यादेच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाही संदर्भातील मार्गदर्शक सुचनांमध्ये केंद्रशासनाने डाळी, तांदुळ, खाद्यतेल व खाद्यतेलबिया यांच्या साठयावर निर्बंध आणलेले आहेत त्यामुळे या वस्तुंचा व्यापार करण्यासाठी घाऊक अथवा किरकोळ परवाना घेणे आवश्यक आहे. तसेच शासन परिपत्रक क्र. ईसीए-१०१०/४९५/प्र.क्र.९४/ना.पु.२३ दिनांक २० मे, २०१० अन्वये केंद्र शासनाने तांदुळ, धान, डाळी, खाद्यतेल व खाद्यतेलबिया यांच्या साठामर्यादेवर निर्बंध लागु केले आहेत. सबब, या वस्तुंचा व्यापार व साठवणुक करण्याकरीता संबंधित अनुज्ञप्ती प्राधिकाऱ्याकडून परवाना घेणे आवश्यक आहे. या वस्तुंच्या आयातदारांना साठामर्यादेतुन सुट देण्यात आलेली आहे. परंतु खाद्यतेल व खाद्यतेलबिया यांच्या निर्यातदारांना परवाना घेणे आवश्यक आहे. म्हणजेच डाळी/कडधान्य तसेच अन्नधान्य, खाद्यतेल व खाद्यतेलबिया या अनुसुचित वस्तुंचा व्यापार करणारे घाऊक व्यापारी व निर्यातदार यांना सदर अनुसुचित वस्तुंच्या खरेदी, साठवणूक व विक्री करीता महाराष्ट्र अनुसुचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञाप्ती आदेश १९९८ अन्वये घाऊक परवाना घेण्याची आवश्यकता आहे.

महाराष्ट्र अनुसुचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञाप्ती आदेश १९९८ अन्वये देण्यात येणाऱ्या घाऊक परवानामधील "अट क्रमांक २(अ) नुसार अनुज्ञप्तीधारक उपरोक्त व्यवसाय परवानामधील नमुद जागेत व्यवसाय करण्याबाबत" सुचित केले असुन, अट क्रमांक २(ब) नुसार "अनुज्ञप्तीधारक ज्याला उपरोक्त धंदा चालवावयाचा आहे. अनुसुचित वस्तुचा परवानामध्ये उल्लेखिलेल्या गोदामांव्यतिरीक्त इतर कोणत्याही ठिकाणी साठवणुक न करण्याबाबत" नमुद आहे. तसेच "अनुज्ञप्तीधारकाला नमुद केलेल्या ठिकाणाशिवाय इतर ठिकाणी त्याला अनुसुचित वस्तुंचा साठा ठेवण्याची इच्छा असल्यास त्याने त्याबाबत प्रत्यक्ष असे गोदाम कब्जात घेतल्यापासुन ४८ तासात कळविले पाहीजे व अनुज्ञाप्ती, बदल करण्यासाठी, अनुज्ञाप्ती प्राधिकरणाला सादर केली पाहिजे" असे स्पष्ट नमुद केले आहे.

एपीएमसी पोलिस ठाणे येथील तपासी पोलिस अधिकारी यांचे टपालामार्फत प्राप्त अभिवेदनात, यातील अटक आरोपी यांचे शिवम वेअरहाऊसमध्ये मिळून आलेला अन्नधान्य/कडधान्याचा साठा हा विविध व्यापाऱ्यांचा असून सदर गुन्ह्यात जप्त करण्यात आलेला अन्नधान्य/कडधान्याचा साठा हा नमुद व्यापाऱ्यांचा असून त्यांचा सदरचा साठा यातील अटक आरोपी यांनी शिधावाटप आस्थापनेचा घाउक संयुक्त परवाना (पीडीएल/एफडीएल)

व इतर परवाने नसताना बेकायदेशिररित्या साठवणूक केला असल्याचे निष्पन्न झाले आहे. तरी नमूद धान्याच्या साठ्याबाबत योग्य तो आदेश होणेस विनंती असल्याचे सांगितले.

मे. हिंगलज एंटरप्रायझेस, मे. किरीटकुमार गरोडीया ॲण्ड कंपनी, मे. फाईन फुड प्रॉडक्टस्, मे. चंदरकुमार ओमप्रकाश, मे. जे उदय ॲण्ड कंपनी, मे. अरविंद ट्रेडिंग, मे. द ग्रेन मार्ट, मे. नंदादीप ट्रेडिंग कंपनी, मे. डिलाईट फुड्स प्रा. लि., मे. जगदीश ॲन्ड कंपनी, मे. अमृतलाल दामजी ॲण्ड कंपनी व मे. शिवम कॉर्पोरेशन या सर्व आस्थापनांच्या मालकांनी सुनावणीच्यावेळी केलेल्या खुलाशात, त्यांचा नमूद गोदामात तांदळाचा साठा जप्त असून सदरचा साठा त्यांनी शिवम वेअरहाऊसच्या गोदामात साठवणुक केले असल्याचे सांगितले. निवेदनासोबत उपरोक्त साठामालकांनी विविध परवाने, जप्त साठ्याची खरेदी बिले, नमुद गोदामात साठवणुक केल्याबाबत अथवा कायमस्वरुपी अतिरीक्त गोदाम नोंदीकरीता केलेला अर्ज व इतर दस्ताऐवजांच्या सादर केलेल्या छायांकीत प्रतींचे अवलोकन करता सर्व आस्थापनांकडे महाराष्ट्र अनुसुचित वस्तु घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश, १९९८ अन्वये अन्नधान्याच्या व्यवसायाकरीता संयुक्त घाऊक परवाना आहे. सदरहु परवानाधारकांपैकी मे. जगदीश ॲन्ड कंपनी यांच्या संयुक्त घाऊक परवान्यावर अतिरीक्त गोदाम म्हणुन मे. शिवम वेअरहाऊस या गोदामाची नोंद असुन उर्वरीत साठा मालकांच्या परवान्यांवर वेगळे गोदामाची नोंद नसल्याचे आढळून येते. अनुज्ञप्तीमधील अटीनुसार "अनुज्ञप्तीधारकाला नमुद केलेल्या ठिकाणाशिवाय इतर ठिकाणी त्याला अनुसुचित वस्तुंचा साठा ठेवण्याची इच्छा असल्यास त्याने त्याबाबत प्रत्यक्ष असे गोदाम कब्जात घेतल्यापासुन ४८ तासात कळविणे बंधनकारक आहे." त्या अनुषंगाने इतर उर्वरीत साठामालकांनी त्यांच्या परवान्यावर मे. शिवम वेअरहाऊस या अतिरीक्त गोदामाची नोंद करण्यासाठी अथवा सदर वेअरहाऊसवर त्यांचा साठा ठेवले असल्याबाबत त्यांनी उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे या अनुज्ञप्ती प्राधिकारी यांच्या कार्यालयात सुचनापत्र सादर केल्याचे छायांकित प्रतींवरुन दिसुन येते. सदर सुचनापत्र/अर्जाबाबत उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांनी सादर केलेल्या परवानाधारक निहाय परीपूर्ण अहवालात नमुद केले आहे. उपरोक्त साठा मालकांनी त्यांच्या परवान्यांवरील पत्यावर पुरेशा जागे अभावी त्यांनी त्यांच्या मालकीचा खरेदी केलेला परवानावरील साठा त्यांनी तात्पुरत्या स्वरुपात मे. शिवम वेअरहाऊस यांच्या गोदामात साठवणुक केला असल्याचे नमुद केले आहे. सबब, नमूद आस्थापनांच्या मालकांनी त्यांना देण्यात आलेल्या परवान्यांमधील अटीं/शर्तीचे पालन करुन त्यांचा खरेदी केलेला तांदळाचा साठा हा अवैध साठवणुकीच्या उद्देशाने साठवणुक केल्याचे दिसुन येत नसल्याने मे. हिंगलज एंटरप्रायझेस, मे. किरीटकुमार गरोडीया ॲण्ड कंपनी, मे. फाईन फुड प्रॉडक्टस्, मे. चंदरकुमार ओमप्रकाश, मे. जे उदय ॲण्ड कंपनी, मे. अरविंद ट्रेडिंग, मे. द ग्रेन मार्ट, मे. नंदादीप ट्रेडिंग कंपनी, मे. डिलाईट फुड्स प्रा. लि., मे. जगदीश ॲन्ड कंपनी, मे. अमृतलाल दामजी ॲण्ड कंपनी व मे. शिवम कॉर्पोरेशन या सर्व साठामालकांचा जप्त करण्यात आलेला तांदळाचा संपूर्ण साठा हा बंधपत्र घेऊन त्यांना परत करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

मे. वरदान राईस ट्रेडर्स, मे. सिध्दीविनायक राईस ट्रेडर्स, मे. नर्मदा ट्रेडर्स, मे. रघुवीर राईस ट्रेडर्स, मे. नम्रता कॉर्पोरेशन, मे. संजयकुमार कल्याणजी, मे. मुनीलाल डायाभाई गाला, मे. नरेंद्र ट्रेडिंग व मे. श्री शक्ती एंटरप्रायझेसचे मालक यांनी सुनावणीच्यावेळी केलेल्या खुलाशात, त्यांचा नमूद गोदामात तांदळाचा साठा जप्त असून सदरचा साठा त्यांनी मे. शिवम वेअरहाऊस या गोदामात साठवणुक केल्याचे सांगितले. तसेच मे. बॉम्बे सप्लाय व मे. जयराज फुड प्रा.लि. यांनी त्यांचे साठा संबंधिचे पुरावादर्शक कागदपत्रे यापूर्वीच गोदाम मालकाने सादर केलेल्या निवेदनासोबत सादर केले असल्याचे सांगितले. निवेदनासोबत नमुद साठामालकांनी विविध परवाने तसेच सादर केलेल्या साठ्याच्या खरेदी बिलांच्या छायांकीत प्रतींचे अवलोकन करता महाराष्ट्र अनुसुचित वस्तु घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश, १९९८ अन्वये त्यांनी अन्नधान्य अथवा कडधान्याच्या व्यवसायाकरीता घाऊक परवाना घेतला असुन सदर परवान्यांवर वेगळ्या गोदामांची नोंद निरंक असल्याचे दिसुन येते. नमुद परवानाधारकांनी सादर केलेले निवेदन हे मोघम स्वरुपाचे असुन शासनाची दिशाभुल करणारे आहे. अनुज्ञप्तीमधील अटीनुसार "अनुज्ञप्तीधारकाला नमुद केलेल्या ठिकाणाशिवाय इतर ठिकाणी त्याला अनुसुचित वस्तुंचा साठा ठेवण्याची इच्छा असल्यास त्याने त्याबाबत प्रत्यक्ष असे गोदाम कब्जात घेतल्यापासुन ४८ तासात कळविणे बंधनकारक आहे." तथापी, वरील आस्थापनांच्या मालकांपैकी मे. सिध्दीविनायक राईस ट्रेडर्स यांनी दिनांक २६/०७/२०१२ रोजी, मे. रघुवीर राईस ट्रेडर्स यांनी दिनांक २४/०७/२०१२ रोजी, मे. संजयकुमार कल्याणजी यांनी दिनांक २५/०७/२०१२ रोजी व मे. जयराज फुड प्रा.लि. यांनी दिनांक २३/०७/२०१२ रोजी म्हणजेच या कार्यालयाच्या वतीने करण्यात आलेल्या जप्तीच्या कारवाई नंतर त्यांनी, उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे या अनुज्ञप्तीप्राधिकारी यांच्या कार्यालयात मे. शिवम वेअरहाऊस या गोदामात त्यांचा तांदूळ/कडधान्याचा साठा ठेवल्याबाबतचे सुचनापत्र सादर केले असल्याने त्यांनी केवळ सोपस्कार पुर्ण करुन शासनाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच उर्वरीत साठामालकांनी त्यांचा साठा नमूद गोदामात साठवणूक केल्याबांबतचे सुचनापत्रही सादर न केल्याचे दिसुन येते. उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांनी सादर केलेल्या परवानाधारकनिहाय परिपुर्ण अहवालांत, सदर साठा मालकांनी नमुद वेअरहाऊसमध्ये साठवणुक केल्याबाबतचे सुचनापत्र त्यांच्या कार्यालयात सादर न केल्याबाबत अथवा तपासणी नंतर सादर केल्याने प्रकरणी त्यांचे अर्ज ग्राहय धरता येणार नाही, असे नमुद केले आहे.

सबब, मे. वरदान राईस ट्रेडर्स, मे. सिध्दीविनायक राईस ट्रेडर्स, मे. नर्मदा ट्रेडर्स, मे. रघुवीर राईस ट्रेडर्स, मे. नम्रता कॉर्पोरेशन, मे. संजयकुमार कल्याणजी, मे. मुनीलाल डायाभाई गाला, मे. नरेंद्र ट्रेडिंग, मे. श्री शक्ती एंटरप्रायझेस, मे. बॉम्बे सप्लाय व मे. जयराज फुड प्रा.लि. या सांठा मालकांनी साठेबाजीच्या उद्देशाने अवैध साठवणुक करुन स्थानिक बाजारपेठेत कृत्रिम टंचाई निर्माण करुन जीवनावश्यक वस्तुंच्या भाववाढीस प्रोत्साहन दिल्याचे सिध्द झाले आहे. सदर परवाना धारकांनी त्यांच्या परवान्यावरील नमुद पत्त्याव्यंतिरीक्त अन्य ठिकाणी

साठवणुक केल्याचे सुचनापत्र सादर केले नाही अथवा परवान्यावर गोदामाची नोंद करुन न घेतल्याने त्यांनी महाराष्ट्र अनुसुचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञाप्ती आदेश, १९९८ अन्वये त्यांना देण्यात आलेल्या परवानामधील तरतुदींचा व त्यामधील अटी/शर्तींचा तसेच पर्यायाने जीवनावश्यक वस्तु कायदा, १९५५ चा भंग केल्याचे निष्पन्न झाल्याने, मे. वरदान राईस ट्रेडर्स, मे. सिध्दीविनायक राईस ट्रेडर्स, मे. नर्मदा ट्रेडर्स, मे. रघुवीर राईस ट्रेडर्स, मे. नम्रता कॉर्पोरेशन, मे. संजयकुमार कल्याणजी, मे. मनीलाल डायाभाई गाला, मे. नरेंद्र ट्रेडिंग, मे. श्री शक्ती एंटरप्रायझेस व मे. बॉम्बे सप्लाय या सर्व साठामालकांचा जप्त करण्यात आलेला तांदळाचा संपुर्ण साठा तसेच व मे. जयराज फुड प्रा.लि. यांचा तांदूळ/कडधान्याचा साठा हा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी मे. शिवम वेअरहाऊसचे मालक भरत एन. व्होरा यांनी सुनावणीच्यावेळी केलेल्या खुलाशात, त्यांचे वेअरहाऊस हे मे. कामधेनु एन्टरप्रायझेस यांच्याकडून दिनांक ३०/०९/२०१३ पर्यंत ३३ महिन्यांच्या कालावधीकरीता भाडेतत्वावर वेअरहाऊसिंग करीता घेतल्याचे सांगुन सदर वेअरहाऊसिंगच्या व्यवसायाकरीता एनएनएमसी तसेच अन्न व औषध प्रशासन विभागाकडून परवाना घेतले असल्याचे सांगितले आहे. त्यांच्या वेअरहाऊसमधील जप्त करण्यात आलेला साठा हा विविध साठामालकांचा असल्याचे सांगुन त्याबाबतचे आवश्यक कागदपत्रे निवेदनासोबत सादर केले असल्याचे सांगितले. कारणे दाखवा नोटीसमधील नमुद जप्त साठा यामध्ये तफावत असल्याचे सांगुन त्यांच्या वेअरहाऊसमधील दैनिक साठा नोंदवही दिनांक २१/०७/२०१२ पर्यंत अद्यावत असल्याचे नमुद करुन त्याअनुषंगाने आढळून आलेली तफावत साठामालक निहाय यादी जोडण्यात आली आहे. मे. तपोवन ट्रेडिंग कंपनी यांनी ५० किलो क्षमतेच्या २११ बाचक्यांमधील बाजरीचा साठा साठवणुक केला असल्याचे सांगुन सदर जिन्नस करीता शिधावाटप परवाण्याची गरज नसल्याचे नमुद करुन जप्त करण्यात आलेल्या साठयाचे धुरीकरण (Fumigation) ची परवानगी देण्यात यावी. बाजरीचा साठा मुक्त करण्यात यावा. वेअरहाऊस व त्यामधील जप्त साठा मुक्त करण्याची विनंती केली. यावरुन त्यांनी सादर केलेले निवेदन हे मोघम स्वरुपाचे व शासनाची दिशाभुल करणारे आहे. मे. शिवम वेअरहाऊसचे मालक यांनी त्यांच्या वेअरहाऊसमध्ये विविध व्यापाऱ्यांचा अनुसुचित वस्तुंचा साठा हा साठवणुक करुन घेतांना सदरहु साठा मालकांनी त्यांच्या घाऊक परवान्यावर मे. शिवम वेअरहाऊस या अतिरिक्त गोदामाची नोंद केली आहे किंवा कसे? याची खातरजमा करणे तसेच त्यासंबंधीचे पुरावादर्शक कागदपत्रे घेणे आवश्यक होते. तथापी, मे. शिवम वेअरहाऊसचे मालक यांनी याबाबत संबंधित परवाना धारकांकडून सदर बाबत पूर्तता करुन न घेता अथवा संबंधित परवानाधारकास पुर्तता करुन घेण्यास आवश्यक करारनामा इ. कागदपत्रे उपलब्ध करुन न देता त्यांनी त्यांच्या गोदामात अवैध साठवणुक व साठेबाजीच्या उद्देशाने साठवणुक केलेल्या साठामालकास गैरमार्गाने मदत करुन त्यांनी स्वतःच्या आर्थिक फायदयासाठी जीवनावश्यक वस्तुंच्या भाववाढीस प्रोत्साहन दिल्याचे निष्पन्न होत आहे.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये ए.पी.एम.सी. पोलिस ठाणे, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ३०५८/२०१२ दिनांक २२/०७/२०१२ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

**आदेश :-**

१) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. हिंगलज एंटरप्रायझेस यांचा २९९८८० किलो तांदळाचा संपूर्ण साठा हा बंधपत्र घेऊन त्यांना परत करण्यात यावा.

२) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. किरीटकुमार गरोडीया ॲण्ड कंपनी यांचा ३८९०० किलो तांदळाचा संपूर्ण साठा हा बंधपत्र घेऊन त्यांना परत करण्यात यावा.

३) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. फाईन फुड प्रॉडक्टस् यांचा २७८२५ किलो तांदळाचा संपूर्ण साठा हा बंधपत्र घेऊन त्यांना परत करण्यात यावा.

४) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. चंदरकुमार ओमप्रकाश यांचा २९२९० किलो तांदळाचा संपूर्ण साठा हा बंधपत्र घेऊन त्यांना परत करण्यात यावा.

५) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. जे उदय ॲण्ड कंपनी यांचा ६३४७५ किलो तांदळाचा संपूर्ण साठा हा बंधपत्र घेऊन त्यांना परत करण्यात यावा.

६) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. अरविंद ट्रेडिंग कंपनी यांचा १३७५० किलो तांदळाचा संपूर्ण साठा हा बंधपत्र घेऊन त्यांना परत करण्यात यावा.

७) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. द ग्रेन मार्ट यांचा ५८०० किलो तांदळाचा संपूर्ण साठा हा बंधपत्र घेऊन त्यांना परत करण्यात यावा.

८) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. नंदादीप ट्रेडिंग् कंपनी यांचा ५०३२५ किलो तांदळाचा संपूर्ण साठा हा बंधपत्र घेऊन त्यांना परत करण्यात यावा.

९) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. डिलाईट फुड्स प्रा. लि. यांचा ७३६० किलो तांदळाचा संपूर्ण साठा हा बंधपत्र घेऊन त्यांना परत करण्यात यावा.

१०) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. जगदीश ॲन्ड कंपनी यांचा ६०३० किलो तांदळाचा संपूर्ण साठा हा बंधपत्र घेऊन त्यांना परत करण्यात यावा.

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES ... OFFICE

११) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. अमृतलाल दामजी ॲण्ड कंपनी यांचा २४५० किलो तांदळाचा संपूर्ण साठा हा बंधपत्र घेऊन त्यांना परत करण्यात यावा.

१२) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. शिवम कॉर्पोरेशन यांचा ८२०७० किलो तांदळाचा संपूर्ण साठा हा बंधपत्र घेऊन त्यांना परत करण्यात यावा.

१३) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. वरदान राईस ट्रेडर्स यांचा ३२५ किलो तांदळाचा संपूर्ण साठा शासनजमा करण्यात यावा.

१४) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. सिध्दीविनायक राईस ट्रेडर्स यांचा ६२१२५ किलो तांदळाचा संपूर्ण साठा शासनजमा करण्यात यावा.

१५) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. नर्मदा ट्रेडर्स यांचा ३५०५० किलो तांदळाचा संपूर्ण साठा शासनजमा करण्यात यावा.

१६) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. रघुवीर राईस ट्रेडर्स यांचा १९०२५ किलो तांदळाचा संपूर्ण साठा शासनजमा करण्यात यावा.

१७) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. नम्रता कॉर्पोरेशन यांचा २२०७० किलो तांदळाचा संपूर्ण साठा शासनजमा करण्यात यावा.

१८) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. संजयकुमार कल्याणजी यांचा २६५३५ किलो तांदळाचा संपूर्ण साठा शासनजमा करण्यात यावा.

१९) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. मनीलाल डायाभाई गाला यांचा ३२५ किलो तांदळाचा संपूर्ण साठा शासनजमा करण्यात यावा.

२०) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. नरेंद्र ट्रेडिंग यांचा ८२५० किलो तांदळाचा संपूर्ण साठा शासनजमा करण्यात यावा.

२१) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. श्री शक्ती एंटरप्रायझेस यांचा १२३२५० किलो तांदळाचा संपूर्ण साठा शासनजमा करण्यात यावा.

२२) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. बॉम्बे सप्लाय यांचा ४७५ किलो तांदळाचा संपूर्ण साठा शासनजमा करण्यात यावा.

२३) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. जयराज फुड प्रा.लि. यांचा १४४३० किलो तांदळाचा, १५८७० किलो तुरडाळचा, ९२४० किलो मुगडाळचा, ३०६० किलो उडिद डाळचा, १८९० किलो चणा डाळचा, ६२५ किलो चणाचा, ७२० किलो मूगडाळ (छिलटेवाली) चा संपूर्ण साठा शासनजमा करण्यात यावा.



002

२४) सदर शासनजमा करण्यात आलेला संपूर्ण तांदळाचा साठा पोलिसांनी, उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांच्या मदतीने वैध परवानाधारकास प्रचलित दराने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) मे. शिवम वेअरहाऊसचे मालक भरतकुमार नानजी व्होरा
२) मे. हिंगलाल इंटरप्रायझेसचे मालक
३) मे. वरदान राईस ट्रेडर्सचे मालक
४) मे. सिध्दीविनायक राईस ट्रेडर्सचे मालक
५) मे. किरीटकुमार गरोडीया ॲण्ड कंपनीचे मालक
६) मे. फाईन फुड प्रॉडक्टस्चे मालक
७) मे. चंदरकुमार ओमप्रकाशचे मालक
८) मे. जे उदय ॲण्ड कंपनीचे मालक
९) मे. अरविंद ट्रेडिंगचे मालक
१०) मे. बॉम्बे सप्लायचे मालक
११) मे. द ग्रेन मार्टचे मालक
१२) मे. नर्मदा ट्रेडर्सचे मालक
१३) मे. रघुवीर राईस ट्रेडर्सचे मालक
१४) मे. नंदादीप ट्रेडिंग कंपनीचे मालक
१५) मे. नम्रता कॉर्पोरेशनचे मालक
१६) मे. संजयकुमार कल्याणजीचे मालक
१७) मे. मनीलाल डायाभाई गालाचे मालक
१८) मे. नरेंद्र ट्रेडिंग कंपनीचे मालक
१९) मे. श्री शक्ती एंटरप्रायझेसचे मालक
२०) मे. दिलाईट फुडचे मालक

२१) मे. जगदीश आणि कंपनीचे मालक

२२) मे. अमृतलाल दामजी ॲण्ड कंपनीचे मालक

२३) मे. शिवम कॉर्पोरेशनचे मालक

२४) मे. जयराज फुड प्रा.लि. चे मालक

(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, एपीएमसी पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, ए.पी.एम.सी. पोलिस ठाणे, नवी मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल सात दिवसात या कार्यालयास सादर करावा.

२) उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

३) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.

४) कार्यासन अधिकारी, दक्षता शाखा, का.क्र. ५, प्रधान कार्यालय, मुंबई यांना माहितीस्तव.

५) निवड नस्ती.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI